# बोडवड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिराचे उद्घाटन संपन्न

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोडवड येथील रा .से . यो एककच्या विशेष हिवाळी शिबिराला दत्तक ग्राम हरणखेड येथे 24.12.2018 त 30.12.2018 सुरुवात झाली .शिबिराचे उद्घाटन जि.प. शाळेतिल दिव्यांग विद्यार्थी कुंदन विठ्ठल खराटे यांचे शुभ हस्ते व संस्थेचे सचिव मा . श्री विकास भाऊ कोटेचा यांच्या अध्यक्षेखाली संपन्न झाला. तर उद्घाटक उपस्थित होते . विशेष अतिथि म्हणून हरणखेड येथील सरपंच सौ .समिता रूपेश गांधी, संस्थेचे जेष्ठ संचालक श्री श्रीराम भाऊ बडगुजर उपस्थित होते.

“तरुण हा देशाचा कणा आहे. देशाची सर्वांगीण प्रगती तरुणांच्या माध्यमातून होऊ शकते.” असे मत आहे शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे सचिव मा.श्री विकास भाऊ कोटेचा यांनी व्यक्त केले. तर “स्वयंसेवकांनी स्वछ भारत आभियानाचा दुवा म्हणून काम केले पाहिजे.” असे सांगून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी यांनी स्वयंसेवकांचे मनोबल वाढविले.

शिबिराचे प्रास्ताविक कार्यक्रम आधिकारी डॉ. सी.टी शर्मा यांनी मांडले व शिबिरामध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती दिली . सूत्र संचालन कु .वैशाली माळी व आभार निखिल पाटील या स्वयंसेवकांनी केले. उद्घाटन प्रसंगी उप प्राचार्य डी. एस. पाटील, गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री. रूपेशभाऊ गांधी, श्री. नरहरी वराडे(उपसरपंच ), प्रकाश खाचणे, विवेक जोशी , श्रीकृष्णा रोकडे ,अनीता गवळी ,प्रल्हाद पांडे, शरद खडसे , रविंद्र वराडे , विजयसिंह पाटील यांचे सहकार्य लाभले

